महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१
कार्यालयाचे संकेतस्थळ :- www.dhepune.gov.in कार्यालयीन ई-मेल:-stat.dhepune@nic.in
फोन क्र:- ०२०/६५००१०१६/६५००११७३/ फॅक्स क्र:-०२०/२६१११११५३

क्र.उशिसं /२०१५-१६ /डिजिटल इंडिया/सांख्यिकी/ ७५२७ . दिनांक - २४.७.२०१५

प्रति,

१) सहसंचालक (उच्च शिक्षण)
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर/सोलापूर/अमरावती/जळगांव/पनवेल/नांदेड

२) कुलसचिव
सर्व अकृषी विदयापीठे, महाराष्ट्र राज्य , मुंबई

UNIVERSITY OF MUMBAI
0 3 AUG 2015
20104

विषय - डिजिटल इंडिया वीक कार्यक्रमाबाबत

संदर्भ - १) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ई-ऑफिस-२०१५/प्रक्र(५९/१५/)/ताशि-१ दिनांक २२.६.२०१५
२) संचालनालयाचे समक्रमांकाचे दिनांक २४.६.२०१५ चे पत्र क्रमांक ६२८०

केंद्र शासनाने डिजिटल इंडिया हा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. सदरील कार्यक्रमाव्दारे शासकीय सेवा अधिक पारदर्शक/कार्यक्षमरित्या जनतेला पुरविण्यात येणार आहेत. याकरीता शासनामार्फत डिजिटल इंडिया वीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमाकरीता डॉ.किरण पाटील, उपसचिव (उच्च व तंत्रशिक्षण), मंत्रालय, मुंबई यांची विभागाचे नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

२. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विदयापीठे व संलग्नित महाविदयालयांमध्ये शासनाच्या सुचनेनुसार डिजिटल इंडिया वीक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमातर्गत आपल्या अधिपत्याखालील विदयापीठे, महाविदयालये, शैक्षणिक संस्था यांची नांवे, संपर्क क्रमांक तसेच आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेची तारीख, संबंधित संस्थेतील समन्वय अधिकारी व त्यांचे संपर्क क्रमांक यांची माहिती शासनास सादर करणेबाबत संचालनालयाच्या उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये कळविण्यात आले आहे. तथापि याबाबत अदयाप उपरोक्त माहिती शासनाला सादर करण्यात आली नसल्याचे शासनाकडुन संचालनालयास कळविण्यात आले आहे.

३. विदयापीठांनी सर्व संलग्नित महाविदयालयांची तसेच आपल्या विदयापीठाची सदरील विषयाबाबतची माहिती खालील विहित विवरणपत्रात एकत्रित करुन मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना technical.education11@gmail.com हया ई-मेल क्रमांकावर उपलब्ध करुन दयावी.

PRO

03/08/15

(कृमाप)

३. सदरील विषयाचे केंद्र व राज्य शासनास्तरावरील प्राथम्य व महत्व लक्षात घेऊन सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी आपल्या विभागातील सर्व विदयापीठे आणि महाविदयालयांची माहिती शासनाला त्वरित उपलब्ध करुन देण्याकरीता विदयापीठांबरोबर नियोजन व पाठपुरावा करावा.

| अ.क्र. | विदयापीठाचे नांव | महाविदयालयाचे नांव | महाविदयालयाचा प्रकार | प्राचार्यांचे नांव | मोबाईल क्रमांक | निश्चित केलेल्या समन्वय अधिका-यांचे नांव | मोबाईल क्रमांक | निश्चित करण्यात आलेल्या कार्यशाळेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे